श्री- कंडाळे, 'अ' बाबत कार्यवाहीस्तव

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 829 दिनांक- 09.04.25
संबंधित अधि./कर्म.
न.र. 09/04/25 उ.सं.न.र.

**विकास योजना दोंडाईचा-वरवाडे (वाढीव हद्द), जि.धुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) अन्वयेचे आदेश.**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालये,**
**पुणे - ४११ ००१**

**निर्णय**: जा.क्र. वि.यो. दोंडाईचा-वरवाडे / क-१२७(२)/ आदेश / प्र.क्र. १९८/ टिपीव्ही-४/ ९८७०

**दिनांक** :- ०४.०४.२०२५.

सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी भाषेतील) महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

**(दे.व्यं. चावरे)**
कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-४,
मुख्य कार्यालय, पुणे.

प्रति,

मा.व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा, पुणे.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (इंग्रजी व मराठी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या **५ छापील प्रती** या कार्यालयास व **प्रत्येकी २ छापील प्रती** सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक आणि सहायक संचालक, नगर रचना, धुळे शाखा, धुळे यांना पाठवाव्यात.

**प्रत माहितीस्तव सादर**:-

१.मा. अपर मुख्य, सचिव (१),महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग(नवि-९),मंत्रालय, मुंबई-३२.
२.मा. सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.
३.मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४.मा. जिल्हाधिकारी, धुळे.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव** :-

१. मा. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर आदेश अभिलेखार्थ त्यांचेकडील त्या संबंधीच्या संकलन नस्तीमध्ये जोडावेत. तसेच सदर आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करावेत. 'अ'

६. मा. सहायक संचालक, नगर रचना, धुळे शाखा, धुळे.

/-प्रस्तुत प्रकरणी त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या **सहा** प्रती संचालनालयास विहीत मार्गाने त्वरीत सादर कराव्यात.

७. मुख्याधिकारी, नगर परिषद, दोंडाईचा-वरवाडे, ता. सिंदखेडा, जि. धुळे.

८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे यांनी सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.

९. श्रीमती लिलाबाई चंपालाल छाजेड व इतर रा. दोंडाईचा, ता.सिंदखेडा, जि.धुळे

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत,पुणे,४११००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६** **Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in**

## आदेश

जा.क्र.डि.टी.पी./वि.यो.दोंडाईचा-वरवाडे/कलम-१२७(२)/
आदेश/ प्र.क्र. १९८/टिपीव्ही-४/१८९० दि.०४ .०४.२०२५.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, दोंडाईचा-वरवाडे नगरपरिषदेची वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) मधील तरतूदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१०१०/२१५९/प्र.क्र.२७१/२०१०/नवि-९, दि. ०३.०४.२०१२ अन्वये मंजूर झाली असून, ती दि. १५.०५.२०१२ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे **"उक्त मंजूर विकास योजना"** असे संबोधिले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील, मौजे दोंडाईचा-वरवाडे येथील स.नं. ५०/१अ या जमिनीमधील क्षेत्र "औद्योगिक प्रशिक्षण संस्था" (यापुढे **"उक्त आरक्षण"** असे संबोधिले आहे) आरक्षणाने बाधित होत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (यापुढे **"उक्त समुचित प्राधिकरण"** असे संबोधिले आहे) आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासुन १०(दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणानी बाधित होणा-या मौजे दोंडाईचा-वरवाडे येथील स.नं. ५०/१अ या जमिनीमधील २०४३० चौ.मी. क्षेत्राबाबत (यापुढे "**उक्त जमिन**" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीच्या जमीन मालकांनी (यापुढे "**उक्त जमीन मालक**" असे संबोधिले आहे) दि.०८.०३.२०११ रोजी या पूर्वीच्या मंजूर विकास योजनेचा तपशिल नमूद करुन उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतूदीन्वये सूचना (यापुढे "**उक्त सूचना**" असे संबोधिले आहे) बजावलेली असून, ती उक्त समुचित प्राधिकरणास दि. ०८.०३.२०११ रोजी प्राप्त झाली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या उक्त जमिन मालकांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ८३५५/२०२३ मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.०२.०२.२०२४ रोजी उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत करणेबाबतचा व सदरची जमीन विकास योजनेतील लगतच्या झोन वापरानुसार जागामालकास उपलब्ध होत असल्याबाबतचा निर्णय दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना ही दि.०८.०३.२०११ रोजी बजावण्यात आलेली असून, उक्त जमीन समाविष्ट असलेली वाढीव हद्दीची विकास योजना ही त्यावेळी उक्त अधिनियमाच्या कलम २६ चे तरतूदीन्वये केवळ प्रसिध्द झालेली असल्याने सदर स्थितीत उक्त सूचना लागू होत नसल्याची बाब नियोजन प्राधिकरणाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र ९८७५४/२०२४ द्वारे नमूद केली होती. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२३.०९.२०२४ च्या

आणि ज्याअर्थी, या प्रस्तावाबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद, दोंडाईचा वरवाडे यांनी पत्र क्र.१५१४/२०२४, दि.०१.१०.२०२४, सहायक संचालक, नगर रचना, धुळे शाखा, धुळे यांनी पत्र क्र.१२९७, दि.०६.११.२०२४ व सहसंचालक नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी पत्र क्र.१७१८, दि.२२.११.२०२४ अन्वये त्याचे कार्यालयाचे अहवाल सादर करुन, मा. उच्च न्यायालयाच्या पारित आदेशास अनुसरुन, उक्त जमीन उक्त आरक्षणातून व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याची शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने संचालनालयाने शासनास केलेल्या संदर्भावर शासनाने पत्र क्र.टिपीएस-१०२५/३९७/प्र.क्र.५२/२०२५/नवि-९, दि.०४.०४.२०२५ अन्वये सदर प्रकरणी मा.न्यायालयांच्या आदेशानुसार, उक्त जमिनीवरील, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त आरक्षण व्यपगत होत असल्याबाबतचे उक्त अधिनिमयाच्या कलम १२७ (२) अन्वयेचे आदेश निर्गमित करण्याबाबत संचालनालयास कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उपकलम (२) नुसार, उक्त मंजूर विकास योजनेमधील उक्त आरक्षण उक्त जागेपुरते व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक झाले आहे;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबत उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये सुधारणा करित आहेत.

**परिशिष्ट**

| अ .क्र. | नगरपरिषद,मौजे, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व विकास योजना अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त सूचनेखालील उक्त जमिनीचा तपशील | व्यपगत झालेल्या आरक्षणाचे अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | **नगरपरिषद**, दोंडाईचा वरवाडे **ता. सिंदखेडा जि.** धुळे | आ.क्र.२६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था क्षेत्र ४८४०० चौ.मी. | स.नं. ५०/१अ | २४३०० चौ.मी. |

टिप:-१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमिन मालकांस उपलब्ध होईल.

२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, दोंडाईचा वरवाडे ता. सिंदखेडा जि. धुळे यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३) सदर आदेश संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Government of Maharashtra
Town Planning and Valuation Department
Directorate of Town Planning
Ground floor, Central Building, Pune 411 001
Telephone No. 020-26122076 Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

---

**ORDER**

No. D.T.P/D.P.Dondaicha Varwade /Sec-127(2)/Order/C.R.No. 198/TPV-IV/ 1810

Date:-. 04 . 04 .2025.

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Development Plan of Dondaicha Varwade Municipal Council has been sanctioned under the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as **"the said Act"**) by the Government of Maharashtra in Urban Development Department vide its Notification No. TPS-1010/2159/CR271 (A)/2010/UD-9, dated.03.04.2012 and the same has come into force with effect from 15.05.2012; (hereinafter referred to as "the said **sanctioned Development Plan**");

And whereas, in the said sanctioned Development Plan, land bearing S.No.50/1A of Mouze Dondaicha Varwade Ta. Sindhkheda Dist. Dhule is affected by Reservation namely Site. "Industrial Training Institute" (hereinafter referred to as "**the said Reservation**");

And whereas, the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservations is the Industrial Training Institute (hereinafter referred to as "the said **Apropriate Authority**");

And whereas, the said Appropriate Authority has not acquired the land under the said Reservation within a period of 10 (ten) years from the date on which the said Reservation came into force;

And whereas, the owners of the land (hereinafter referred to as **"the said Land Owners"**) affected by the said Reservation in respect of the land bearing S.No.50/1A having area 20430 sq.m of Mouze Dondaicha Varwade (hereinafter referred to as **"the said Land"**) has served a Notice dated 08.03.2011 under the provisions of Section 127(1) of the said Act (hereinafter referred to as "the said **Notice**") to the said Appropriate Authority which was received by the said Appropriate Authority on 08.03.2011;

And whereas, in Writ Petition No. 8355/2023 filed by the said Land Owners of the said land, the Hon'ble High Court of Bombay, Aurangabad Bench, has passed an Order dated 02.02.2024 regarding the lapsing of the said reservation on the said land and the said land being made available to the landowners as per the adjacent zone usage in the development plan;

And whereas, since the said notice was served on 08.03.2011 and the Development Plan of the extended area covering the said Land was only

published as per section 26 of the said Act, at that time, under that circumstances the Planning Authority had submitted to Hon. Supreme Court, through Special Leave Petition No. 18751/2024, that the said notice is not tanable However, the Hon. Supreme Court, by its decision dated 23.09.2024, has dismissed the Special Leave Petition;

And whereas, regarding this proposal, considering the order passed by Hon. High Court, the Chief Officer, Municipal Council, Dondaicha Varwade vide letter No. 1514/2024, dated 01.10.2024, Assistant Director, Town Planning, Dhule Branch, Dhule vide letter No. 1297, dated 06.11.2024 and the Joint Director Town Planning, Nashik Division, Nashik vide letter No. 1718, dated 22.11.2024 have submitted their office reports and recommended issuing orders regarding the lapse of the said land from the said reservation;

And whereas, on the reference made to the Government in accordance with the facts of the case the Government, the Government, vide its letter No. TPS-1025/397/Case No.52/2025/UD-9 dated 04.04.2025, has informed the Directorate to issue appropriate orders under section 127(2) of the said Act, in accordance with the directions of the Hon'ble Court, regarding the lapsing of the said reservation from the said Development Plan on the said land;

And whereas, in accordance with the provisions of Section 127(1) of the said Act, it is necessary to issue an order under the provisions of Section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservation from the said sanctioned Development Plan on the said Land of the said Land Owners;

And whereas, as per sub-section (2) of Section 127 of the said Act, it has become necessary to issue an order declaring that the said reservation, as specified in the said Development Plan, has lapsed to the extent of the said land;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this order and as mentioned in the schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservation in respect of the said Land in the said sanctioned Development Plan under the provision of section 127(2) of the said Act and for that purpose amends the said Notification, as follows :-

**SCHEDULE**

| **Sr.No.** | **Municipal Council, Mouje, Tal, Dist.** | **Reservation in the said sanctioned Development Plan, & approx area as per the Development Plan Report ...** | **Description of the said Land under the said Notice** | **Approximate Area lapsed from the said Reservation** |
|---|---|---|---|---|
| 1 | Municipal Council, Dondaicha Varwade , | Res. No 26 Industrial Training Institute Area 48400 Sq.m. | S.No. 50/1A | 24300 Sq.m. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Dist.Dhule | | | |

**Note :-**

1) The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.
2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which are lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Dondaicha Varwade, Dist. Dhule during office hours on all working days for inspection to public up to One month.
3) This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**.

**(Avinash B. Patil)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune